# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail : cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र.- १९** दिनांक ०८/०२/२०२१

## मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांची मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयास भेट

दिनांक १३ सप्टेंबर २०१९ चे शासन निर्णयानुसार पालघर जिल्हा व ठाणे ग्रामीण जिल्हयाचे विभाजन करुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयास मान्यता मिळाली असुन प्रत्यक्षात कामकाज दिनांक ०१/१०/२०२० रोजी पासुन सुरु झाले आहे. आयुक्तालय सुरु झाल्या पासुन पोलीस महासंचालक कार्यालयाकडून आवश्यक मनुष्यबळ, वाहने, अनुदान पुरविण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत.

आयुक्तालयाच्या नवनिर्मित अद्यावत पोलीस नियंत्रण कक्ष, वेबसाईट व परिषद कक्ष यांचे मा. पोलीस महासंचालकांनी या भेटीत उद्घाटन केले. तसेच आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेशी संवाद साधला आणि आयुक्तालयाच्या कामाचा सर्वंकष आढावा घेतला.

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे आयुक्तालय भेटीच्या दरम्यान अपर पोलीस महांचालक (आस्थापना), अपर पोलीस महांचालक (नि.व.स.) महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त व अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पोलीस अधीक्षक, पालघर आणि आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते.

मा. पोलीस महासंचालकांनी पहिल्या चार महिन्यात आयुक्तालयाची घडी बसविण्याकामी चांगली कामगिरी झाली आहे, या बाबत समाधान व्यक्त केले. तसेच मा. पोलीस महासंचालकांनी आयुक्तालयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती चांगली राखली पाहिजे, गुन्हयांवर नियंत्रण ठेवले पाहिजे, वाहतुक व्यवस्थेकडे लक्ष दिले पाहिजे, समाजातील असामाजिक तत्वांवरती अंकुश ठेवला पाहिजे या बाबत मार्गदर्शन केले. नवनिर्मित आयुक्तालयास मनुष्यबळ पुरविणे व इतर मदत करणेबाबत पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण व पोलीस अधीक्षक, पालघर यांना मा. पोलीस महासंचालकांनी सुचना दिल्या.

नवनिर्मीत पोलीस आयुक्तालयाची घडी बसविण्यासाठी महाराष्ट्र पोलीसांचे वतीने आवश्यक ती मदत केली जाईल या बाबत मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी आश्वस्त केले आहे.